# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ४३९/२०२४ दिनांक- २१/११/२०२४.

## प्रेसनोट

### ८ महिन्यांपासून मालदीव मध्ये अडकलेला "मन पारेख" सुखरूप मायदेशी परतला...

मन पारेख, वय २४ वर्षे हा व्यवसायाने शेफ असून मालदीव येथील राहा रिसॉर्ट मध्ये तो एजंट च्या माध्यमातून डिसेंबर २०२३ मध्ये नोकरी साठी गेला होता. २ महिन्यांच्या नोकरीत मालदीव येथील रिसॉर्ट मालक व तेथील जनरल मॅनेजर यांनी त्याच्याकडून १८ ते २० तास सतत काम करवून घेतले व पगार ही दिला नाही. ते त्याला जेवण ही निकृष्ट दर्जाचे देत होते. तेथील जेवणामुळे त्याला त्रास होऊन त्याची तब्येत दिवसेंदिवस ढासळत चालली होती. मन पोरख हा त्याच्या आई वडिलांचा एकुलता एक मुलगा असून कॉन्ट्रॅक्ट पूर्ण न केल्याबद्दल मागेल तितके पैसे देवून रिसॉर्ट मालकाला मन यास पुन्हा भारतात पाठवण्याची त्यांना विनंती केली परंतु मालकाने कोणताही प्रतिसाद न दिल्याने मन पारेख याची आई गेल्या ६ महिन्यांपासून विविध मार्गाने प्रयत्न करत होत्या.

दिनांक १५/११/२०२४ रोजी मन पारेख याच्या आईने भरोसा सेल येथे रिसॉर्ट मालकाविरोधात तक्रारी अर्ज दिला असता सदरची माहिती तात्काळ वरिष्ठांना देवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय दूतावास यांना संपर्क साधला असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

मालदीव येथील राहा रिसॉर्ट च्या जनरल मॅनेजर याला संपर्क साधून मन पारेख याची तब्येत दिवसेंदिवस खराब होत असून तो त्याच्या आई वडिलांचा एकुलता एक मुलगा असल्याने त्याच्या आईची तब्येत देखील खराब होत चालली आहे त्यामुळे तात्काळ मन पारेख यास भारतात परत पाठवण्याची विनंती केली असता त्यास त्यांनी योग्य प्रतिसाद देत मन पारेख यास १७/११/२०२४ रोजी भारतात पाठविण्याची तयारी दाखवली. तरी... १८/११/२०२४ रोजी मन पारेख हा भारतात सुखरूप परत आला आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), श्री मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेल, भाईंदर कक्षाचे सपोनि/तेजश्री शिंदे, मपोहवा/भारती देशमुख, मपोशि/आफ्रिन जुनैदी, मपोशि/पूजा हांडे, पोशि/अक्षय हासे, मसुब/विजय घाडगे यांनी केली आहे.

---------00000---------